रयत शिक्षण संस्थेचे,

# छत्रपती शिवाजी कॉलेज,सातारा (स्वायत्त महाविद्यालय)

## प्लेसमेंट कमिटी अहवाल- २०१९-२०

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयाच्या प्लेसमेंट कमिटीमार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांचा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना फायदा होऊन विविध कंपन्या व खाजगी आस्थापनामध्ये त्यांची निवड होऊन त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली.

**प्लेसमेंट कमिटी मार्फत वर्षभर खालील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.**

1. TCS PAN INDIA मार्फत दरवर्षी online Registration करून online परीक्षा, प्रत्यक्ष मुलाखत याद्वारे TATA Consultancy Services मध्ये नोकरी करण्याची संधी दिली जाते. यानुसार जुलै व ऑगष्ट २०१९ मध्ये एकूण महाविद्यालयातील एकूण १२८ विद्यार्थ्यांनी Registration केले. परीक्षा ही कोल्हापूर व पुणे याठिकाणी घेण्यात आली. प्रत्यक्ष एकुण ३० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. सदर परीक्षेत एकूण ०८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ज्यांची मुलखात YC College, Satara याठिकाणी घेण्यात आली. ज्यातून प्रत्यक्ष एकूण ०४ विद्यार्थ्यांची पुण्यात होणाऱ्या ट्रेनिंग साठी निवड करण्यात आली.

| अ.क्र. | निवड झालेल्यांचे नाव | वर्ग |
|---|---|---|
| १. | चि.रोहित अमृत भोसले | एम.ए.भाग २ |
| २. | कु.पूजा अर्जुन कदम | एम.ए.भाग २ |
| ३. | कु.धनश्री दादासो. धडाम | एम.ए.भाग २ |
| ४. | चि. कृपेश काशिनाथ माळवे | एम.ए.भाग.२ |

2. विद्यार्थ्यांमध्ये नोकरीसाठीचे गुणकौशल्य यावीत हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन २० ऑगस्ट २०१९ रोजी महाविद्यालयातील हॉल नंबर १४ मध्ये Employability Enhancement Programme या विषयावर पुणे येथील सौ. पल्लवी माटे व श्री. शैलेश देशपांडे यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अनिसा मुजावर उपस्थित होत्या. प्रास्ताविक प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा.निकम मनोहर यांनी केले. तर आभार डॉ. सुभाष कारंडे यांनी मानले. कार्यक्रम आयोजित करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराडे यांचे अमुल्य असे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी एकूण ७४ विद्यार्थी उपस्थित होते.

3. Kotak Mahindra Bank, Satara तर्फे महाविद्यालयात दिनांक २१ऑगष्ट २०१९ रोजी Campus Drive घेण्यात आला. ज्यात एकूण पात्रता धारक १९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कंपनीतर्फे बँकेचे सहायक व्यवस्थापक श्री धनराज राजेघाडगे हे मुलांची निवड करण्यासाठी आले होते. तीन विद्यार्थ्यांची निवड बंगळूरला होणाऱ्या ट्रेनिंग साठी करण्यात आली.

| अ.क्र. | निवड झालेल्यांचे नाव | वर्ग |
|---|---|---|
| १. | चि.लवळे तेजस उत्तम | एम.ए.भाग २ |
| २. | चि. यादव योगेश शंकर | एम.ए.भाग २ |
| ३. | चि.तुपे अभिजित कृष्णराव | एम.ए.भाग २ |

4. "व्यवसाय व रोजगाराच्या संधी" या विषयावर दिनांक ११ डिसेंबर २०१९ रोजी प्लेसमेंट सेल मार्फत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी एक कार्यक्रम घेण्यात आला. प्रमुख व्याख्याते म्हणून आयुर्ग्राम विकास ट्रस्टचे प्रमुख श्री. सुरेंद्र अरविंद काकडे आणि श्री. मोहन निकम (Marketing Executive) हे उपस्थित होते. प्रास्ताविक प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा.निकम मनोहर यांनी केले. तर आभार डॉ. सुभाष कारंडे यांनी मानले. कार्यक्रम आयोजित करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराडे यांचे अमुल्य असे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी एकूण ४८ विद्यार्थी उपस्थित होते.
5. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना Campus Interview ला सामोरे जाताना येणाऱ्या अडचणी सोडवल्या जाव्या व त्यांच्या विविध शंकांचे निरसन व्हावे यासाठी प्लेसमेंट सेल अंतर्गत Information about Campus Interview हा कार्यक्रम दिनांक १० जानेवारी २०२० रोजी घेण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा.डॉ. चेटीवाल आर.पी ( कला व वाणिज्य महाविद्यालय,सातारा.) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अनिसा मुजावर उपस्थित होत्या. प्रास्ताविक प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा.निकम मनोहर यांनी केले. तर आभार डॉ. शिवाजी पाटील( राज्यशास्त्र विभाग प्रमुख) यांनी मानले. कार्यक्रम आयोजित करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराडे यांचे अमुल्य असे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला एकूण ७२ विद्यार्थी उपस्थित होते.

6. इन्फोसिस या आंतरराष्ट्रीय कंपनीतर्फे साताऱ्यातील कला व वाणिज्य महाविद्यालयात दिनांक १३ जानेवारी २०२० रोजी Campus Interview घेण्यात आला. महाविद्यालयातील एकूण ३४ विद्यार्थ्यांनी याठिकाणी आपला सहभाग नोंदविला व परीक्षा व मुलाखतीच्या प्रक्रियेचा अनुभव घेतला.
7. साताऱ्यातील मारुती सुझुकी इंडस्ट्री मार्फत महाविद्यालयात २१ जानेवारी २०२० रोजी Campus Drive घेण्यात आला. ज्यात एकूण पात्रता धारक २२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कंपनीतर्फे कंपनीचे HR Manager श्री. विजयसिंग औताळे आणि कंपनीचे Internal Trainer श्री. सचिन रणदिवे हे मुलांची निवड करण्यासाठी आले होते.
8. TCS PAN INDIA जानेवारी २०२० मध्ये महाविद्यालयातील एकूण ११४ तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी Registration केले. प्रत्यक्ष एकुण ४५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. सदर परीक्षेत एकूण १५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यातील एकूण १३ विद्यार्थी १४ फेब्रुवारी २०२० ला यशवंतराव चव्हाण महावियालय,सातारा. याठिकाणी झालेल्या मुलाखतीला सामोरे गेले.

ज्यातून प्रत्यक्ष एकूण ०७ विद्यार्थ्यांची ट्रेनिंग साठी निवड करण्यात आली.

| अ.क्र. | निवड झालेल्यांचे नाव | वर्ग | विषय |
|---|---|---|---|
| १. | कु.मोरे गौरी बाळासाहेब | बी.ए.भाग.३ | इंग्रजी |
| २. | कु.शेजवळ मंदा हणमंत | बी.ए.भाग.३ | इंग्रजी |
| ३. | कु.चव्हाण प्रमिला भगवान | बी.ए.भाग.३ | इंग्रजी |
| ४. | कु.मोहिते शिवाली राजकुमार | बी.ए.भाग.३ | अर्थशास्त्र |
| ५. | चि.इंगळे आदित्य संजय | बी.ए.भाग.३ | हिंदी |
| ६. | कु.जाधव सायली प्रफ्फुल | बी.ए.भाग.३ | राज्यशास्त्र |
| ७. | चि.हंकारे दिलीप कोंडीराम | बी.ए.भाग.३ | मानसशास्त्र |

**प्रमुख,**
**प्लेसमेंट सेल,**
**छ.शिवाजी कॉलेज,सातारा.**

**प्राचार्य,**
**छत्रपती शिवाजी कॉलेज,**
**सातारा**